# आंतरजातीय विवाह : चळवळीची शक्याशक्यता व दिशा

आपल्या भारतीय समाजात जातिभेद हा शेकडो वर्षांपासून पाळला जात आला आहे आणि त्यामुळे आपल्या समाजाचे मोठे नुकसानही झाले आहे. तरीसुद्धा आजही आपल्यामध्ये जातीयतेची जाणीव मोठ्या प्रमाणावर आहे. आपण स्वतःला व दुसऱ्यांनाही जातीवरून ओळखतो व जातीप्रमाणे वेगवेगळी वागणूक देतो. यामुळे समाजात एक प्रकारची विषमता व दुही आहे व ती दूर झाली पाहिजे असे स : समाजसुधारक सांगत असतात. यासाठी काय केले पाहिजे ? काहीजण वर्णव्यवस्था चांगली होती, ती रहावी, जातिव्यवस्था नष्ट व्हावी असे म्हणतात. तर अनेकजण असा विचार मांडत आले आहेत की वर्णव्यवस्था ही जातिव्यस्थेचेच एक रूप आहे आणि म्हणून दोन्ही नष्ट झाले पाहिजे. या वादात आता येथे शिरण्याचे कारण नाही. पण सर्वसाधारणपणे समाजसुधारक हे मान्य करतात की जातिव्यवस्थेचा आपल्यावर आपल्या मनावर इतका पगडा आहे, की कळत नकळत आमण जातिव्यवस्था टिकविण्याचा प्रयत्न करतो. जातिव्यवस्था ही आपण सोयिस्कर असेल तर गुळगुळीत भाषेत आपण तिचा पाठपुरावा करतो किंवा सोयिस्करपणे त्याबाबत उदासीन रेहातो किंवा दुर्लक्षही करतो. पण जातिव्यवस्था ही मला सोयीची असली तरी ती व्यवस्था मुळात वाईटच आहे, केवळ जन्म कुठल्या जातीत झाला यामुळे सोय किंवा गैरसोय ठरता कामा नये अशी तर आपली धारणा असेल यर जातिव्यवस्थाच नष्ट करण्यासाठी आपण जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत हे ओघाने येते.

## आंतरजातीय विवाह—एक मार्ग

कळत नकळत स्वतःच्या जातीच्या चौकटीत आपण वावरत असतो. वेगवेगळ्या जातीजमातींच्या लोकांशी मैत्री जोडण्याचा व त्यांच्यातील व आपल्यातील मानवतेचा दुवा शोधण्याचा व बळकट करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न आपण करीत नाही. आपण स्वतःभोवती एक सांस्कृतिक कोशही विणतो. जी संस्कृती आपल्या कुटुंबव्यवस्थेतून आपल्याला मिळते, तीच संस्कृती ही आपली संस्कृती असा शिक्का आपण कळत न कळत स्वतःवर मारून घेतो. व आपली जात, आपल्यावरील संस्कार, आपली संस्कृती टिकविणे हे आपले एक अटळ कर्तव्य आहे अशी आपली समजूत होते.

या दुष्ट चक्रातून बाहेर पडायचे असेल, तर आपल्याला आपली जात उल्लंघून पुढे गेले पाहिजे. इतर जातीजमातींच्या लोकांशी आपलेपणा वाढविला पाहिजे. इतकेच नव्हे तर लग्नही इतर जातीत करण्याचा मुद्दाम प्रयत्न करून आपल्या संकुचित जातीय जाणिवेला कायमची रजा दिली पाहिजे. आंतरजातीय विवाह हा व्यक्तिगत जीवनातील जातीयभाव नष्ट करण्याचा मार्ग ठरला पाहिजे.

पण इथे ‘ आंतरजातीय विवाहविषयी आपला काय दृष्टिकोन असावा ?’ असा जर प्रश्न विचारला तर त्याविषयी वेगवेगळ्या भूमिका मांडता येऊ शकतील.

एक भूमिका अशी असू शकेल. विवाहाच्या संदर्भात जात आडवी येऊ नये हे ठीक आहे. पण मुद्दाम आंतर जातीय विवाह यरण्याचा प्रयत्न करावा अशी भूमिका घेऊ नये कारण विवाह हा एक नाजुक प्रश्न आहे. या विषयी काहींचे मत असेही दिसते की विवाह हा मुळात दोन व्यक्तींचा खाजगी प्रश्न आहे. आणि जो प्रश्न मुळात खाजगी आहे, त्याच्या संदर्भात सामाजिक स्वरूपाची चळवळ उभारता येणार नाही. ही भूमिका घेणाऱ्या लोकांना आंतरजातीय विवाह हा तत्त्वतः मान्य असेल, पण आंतरजातीय विवाह ही एक चळवळ होणे मान्य नसेल.

या भूमिकेच्या संदर्भात काही प्रश्न उपस्थित होतील. एकतर आंतरजातीय विवाह ही चळवळ होऊ नये असे जे आपण म्हणतो, त्यामागे हे तर कारण नाहीना की आपण स्वतः आजवर आपल्या जातीच्या व आपल्या सांस्कृतिक कोशाच्या बाहेर जाण्याचा मुद्दामहून प्रयत्नच केला नाही ? हा प्रश्न वरील भूमिका घेणाऱ्याने स्वतःला विचारून पहावा.

## संस्कृती म्हणजे काय ?

मुद्दामहून आंतरजातीय विवाह करण्याच्या भानगडीत पडू नये असे म्हणण्यामागे बऱ्याचदा असा दृष्टिकोन असतो की विवाह म्हणजे केवळ शारीरिक मीलन आणि सहअस्तित्व एवढेच नसून त्याचबरोबर वैवाहिक जीवनात विचार जुळणे, आवडीनिवडी परस्परपूरक असणे, हरघडी—बारीकसारीक कृतीतून व्यक्त होणारी

'संस्कृती परस्परपूरक असण ह्ही अभिप्रेत असते. व आंतरजातीय विवाह हा या सगळयाचा विचार न करता केवळ तत्त्वप्रेमापोटी केला तर असा विवाह पुढे अयशस्वीही होऊ शकेल. हा प्रश्न महत्त्वाचा आहे. पण याबाबतीत मी एवढेच म्हणेन की परज.ीतल्या जोडीदाराची संस्कृती, विचार, संस्कार हे आपल्या संस्कृतीशी, विचारांशी, संस्कारांशी जुळणारच नाहीत, उलट ते परस्परविरोधीच ठरतील असेही गृहीत धरणे चूकच नाही का ? आपल्यावर जसे घरातून संस्कार होतात, तसे घराबाहेरही होतात; शिक्षणातून काही संस्कार होतात व रूढी परंपरांमुळे येणारे काही धार्मिक-कर्मकांडात्मक संस्कार वगळले तर सुशिक्षित समाजात जातीजातीमुळे फारसे सांस्कृतिक अंतर रहात नाही. याबाबत असे म्हणता येईल की वधू व वर अशा दोघांनीही या जातीय संस्कारांतून मुक्ती मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे, त्यांनी अधिक सुजाण मानवतावादी विचारांनी स्वतःला सुसंस्कृत बनविले तर दोन संस्कृतींमधील ही दरी कमी होऊ शकेल. दुसरे म्हणजे आपल्या जातीतल्या जातीतच ठेवणे बरोबर नाही. उलट आंतरजातीय विवाहाच्या माध्यमातून या चांगल्या गोष्टी आपण इतर समाजात संक्रांत करू. कळत किंवा नकळत.

अर्थात परजातीतलाच जोडीदार मिळवायचा असा प्रयत्न करताना वाट पहावी लागेल. कारण हा जोडीदार परजातीतला तर असला पाहिजेच, पण त्याच्याशी आपले विचार जुळले पाहिजेत, मनोमीलनही होऊ शकले पाहिजे. पण असे प्रश्न जातीतल्या जातीत लग्न करणाऱ्या परंपरावाद्यांसमोरही नाहीत का ? अशा लोकांसमोर कित्येकदा जात-पोटजात जुळणे व पत्रिका जुळणे हे मोठे जटिल प्रश्न असतात आणि इतके करून पुन्हा विचार व मने जुळावीत हीही इच्छा असतेच ! तेव्हा आंतरजातीय विवाहेच्छूंना जरा प्रयत्न करावा लागेल व थोडी वाट पहावी लागेल. पण ही परिस्थिती आत्तापर्यंतच्या परिस्थितीपेक्षा फार निराशाजनक आहे असे वाटत नाही.

## आंतरजातीय विवाह : एक साहस

याबाबत असे म्हणता येईल की आंतरजातीय विवाहाला आपण होऊन तयार होण्यात व त्यासाठी प्रयत्न करण्यात एक थ्रिल आहे व हे थ्रिल सामान्यातला सामान्य तरुणही अनुभव शकतो. वस्तुतः हे थ्रिल ठरण्याचे काही कारण नव्हते. परंतु एकंदर आपल्या सामाजिक संस्थांची, विशेषतः कुटुंबसंस्थेची चौकट आंतरजातीय विवाहाला अनुकूल नसल्यामुळे ही गोष्ट आज थ्रिलिंग ठरत आहे. पण त्याचबरोबर आजच्या तरुणांच्या जीवनात कुठे थ्रिल नाही, साहसीपणाला वावच नाही असे जे वारंवार म्हटले जाते, त्याला हे एक उत्तर आहे-'आंतरजातीय विवाहाचे थ्रिल अनुभवा विचारपूर्वक व विवेकपूर्वक अनुभवा !' हे थ्रिलसाठी थ्रिल नाही, तर सामाजिक जाणिवेतून गंभीरतापूर्वक स्वीकारलेले हे थ्रिल आहे. केवळ आईवडिलांसमोर हा विषय मांडून पहा की मी आंतरजातीय विवाह करणार आहे. तेवढयाने कसा संघर्ष होतो ते पहा. ही सत्याग्रहाची सुरवात आहे, एका सांस्कृतिक क्रांतीची सुरवात आहे. जातिप्रथा ही तुमच्या कुटुंबव्यवस्थेत रुजणारी व वाढणारी प्रथा आहे व म्हणून जातिप्रथेला विरोध करायचा असेल तर घरापासून भांडण करावे लागले. हे भांडण अहिंसेच्या, सत्याग्रहाच्या मार्गाने व्हावे असे मला वाटते. घराघरातून अशी अहिंसक सांस्कृतिक क्रांती सुरू व्हावी असे मला वाटते. आईवडिलांच्या व नातेवाइकांच्या हृदयपरिवर्तनाचा प्रयत्न आजच्या सुजाण युवकांनी करावा व आंतरजातीय विवाहामागचे सामाजिक सत्य त्यांनी स्वीकारावे पचवावे याचा युवकांनी आग्रह धरावा, म्हणजेच सत्याग्रह करावा.

## विवाह : व्यक्तिगत की सामाजिक

'विवाह हा केवळ दोन व्यक्तींच्या इच्छेचा प्रश्न आहे आणि त्यामुळे आंतरजातीय विवाहाची सामाजिक चळवळ होऊ शकणार नाही' असे बऱ्याचदा म्हटले जाते. पण हा युक्तिवाद फसवा आहे. कारण खरोखरच जर प्रत्येक तरुणाने वा तरुणीने पालकांच्या पारंपरिक अपेक्षांचा विचार न करता स्वतःची इच्छाअनिच्छा, आवडनिवड हीच लग्नाच्या बाबतीत प्रमाण मानली-म्हणजे खरोखरच लग्न हा पूर्णतया खाजगी प्रश्न बनला तर जात पाहून जातीतल्या जातीत विवाह होण्याचे प्रमाण खूपच कमी होईल. पण प्रत्यक्षात ते होत नाही. 'विवाह हा केवळ दोन व्यक्तींचा इच्छेचा-खाजगी प्रश्न आहे' हे विधान व्यवहारात खोटेच ठरते. तरुण-तरुणींचे विवाह कसे ठरतात वा ठरविले जातात ?

बहुतेक उदाहरणात हा एक वधुवरांच्या सर्वस्वी उत्स्फूर्त निवडीचा आविष्कार नसून यात इतर अनेक सामाजिक घटक गुंतलेले असतात. बहुसंख्य उदाहरणात मुलाचा विवाह ठरविण्यात पालक । वडीलधारे नातेवाईक पुढाकार घेतात व ते साहजिकच स्थळे बघताना प्रथम जातीचा विचार करतील. हे ओघा.[illegible] येते. आपल्या जातीच्या बंदिस्त कौटुंबिक चौकटीत सामावून घेतली जाईल अशीच वधू निवडण्याचा प्रयत्न त्या त्या जातीचे वर पिते करतात. तेव्हा बहुसंख्य विवाह हे एका सामाजिक चाकोरीतून ठरविले जातात व या सामाजिक चाकोरीला नियंत्रित करणारी 'रक्तशुद्धी' वंशमहात्म्य, बेटीबंदी यांसारखी विवाहविषयक मूल्ये असतात असे सध्या दिसून येते.

## चळवळीचा मार्ग

या मूल्यांचे शास्त्रीय मूल्यांकन करून ती बदलण्यासाठी सामाजिक चळवळ ही आवश्यक होऊन बसते.त्याचप्रमाणे सध्या ज्या सामाजिक संस्थांच्या माध्यमातून ही सजातीय लग्ने ठरतात त्याला पर्यायी सामाजिक संस्थांची साखळी उपलब्ध करणे हे ही या सामाजिक चळवळीचे अंग ठरते. या सामाजि[illegible] संस्थांमध्ये आंतरजातीय वधूवर सूचक मंडळे व आंतरजातीय परिचय कें[illegible]—परिचय मेळावे यांचा अंतर्भाव होईल. या संस्थांची जबाबदारी दुहेरी असेल. सध्याच्या विवाहसंस्था बहुधा विवाह जुळविण्यासाठी स्वतः फारशी खटपट करीत नाहीत, तर फक्त माहितीची देवाण–घेवाण करतात. खटपटीचे काम पालकमंडळी करतात. पण आंतरजातीय विवाह संस्थांना विवाह जुळविण्यासाठी खटपट करणाऱ्या पालकांचीही भूमिका कमीअधिक प्रमाणात बजावावी लागेल. कारण आज तरी मुलांचे पालक सहसा आंतरजातीय विवाह जमविण्याची खटपट करायला तयार होणार नाहीत. फार तर ते मुलगा किंवा मुलगी त्याबाबत हट्टाला पेटली तर नाइलाजाने परवानगी देतील. तेव्हा आंतरजातीय विवाहसंस्थांना लग्नेच्छूंना अधिकाधिक सुयोग अशी जातीबाहेरची स्थळे मिळवून देण्यासाठी व त्यांचा परस्परपरिचय घडवून त्यांच्याशी विचारविनिमय करून त्यांचे लग्न जुळविण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. थोडक्यात वधूवरसूचक व पालक अशा दोघांच्या भूमिका या संस्थांना बजवाव्या लागतील.

दुसरे अपेक्षित सामाजिक कार्य हे अर्थात मूल्यपरिवर्तनाचे आहे– जे वरील कार्याच्या बरोबरीनेच होणे अपेक्षित आहे. या मूल्यपरिवर्तनाचे पहिले क्षेत्र तरुणपिढी हे आहे. तरुणांमध्ये या विषयावर मोठ्या प्रमाणावर चर्चा घडवून आणली पाहिजे, स्वतःच्या जातीची बेडी तोडून दुसऱ्या जातीत लग्न करण्याचा निर्णय त्यांनी घ्यावा किंवा निदान मी लग्न ठरविताना जातीचा विचार करणार नाही. व इतर करत असतील तर त्यांनाही तसं करू देणार नाही, अशी पक्की खूणगाठ त्यांनी मनाशी बाळगावी. याबाबत तरुणांना धीट बनविले गेले पाहिजे. जर तरुणतरुणींना आप[illegible]ा लग्नाविषयी व एकूण विवाहसंस्थेविषयी मोकळेपणाने व धिटाईने बोलण्याची संधी उपलब्ध झाली तर ती जातिनिर्मूलनाला उपकारक ठरेल असे वाटते. कारण जेव्हा ही जबाबदारी व हे स्वातंत्र्य तरुणतरुणींचे पालक स्वतःकडेच घेतात, त्यावेळी ते बेटीबंदीवर अधिष्ठित विवाहसंस्थाच आपल्या भूमिकेद्वारा बळवट करणार हे सहज वाटते. उलट तरुणतरुणींच्या मनात – विशेषतः शिक्षण व नोकरीच्या निमित्ताने अन्य जातींबरोबर मिसळणाऱ्या तरुणतरुणींच्या मनात हा जातीचा विचार तितका प्रबळ नसतो पण एकदा पालकांचे वर्चस्व स्वीकारले की ते विवाहसंस्था आणि जातीयभाव यांचा दृढसंबंध जोडणाऱ्या पालकांपुढे मान तुकवितात. म्हणून तरुणतरुणींना या विषयावर धिटाईने बोलले करणे अगत्याचे ठरेल. अर्थात तरुणतरुणींच्या मनात जातपात नाही असे नाही. पण तो जातपातीचा आकस मनमोकळ्या चर्चेच्या वातावरणात कमी होऊ शकेल अशी आशा करायला जागा आहे.

मूल्यपरिवर्तनाचे दुसरे क्षेत्र पालकमंडळी हे आहे. पालकांचे मतपरिवर्तन करण्याचे काम मोठे अवघड आहे. याबाबतीत माणसांची परिस्थिती पशूंपेक्षा वाईट आहे. पशूंचे अपत्य आपल्या पायावर उभे राहिले – स्वतःचे खाद्य स्वतः मिळवू लागले की पालकपशू त्याला दूर सारतात. मग त्यावर अधिकार गाजवित नाहीत. साहजिकच आपल्या अपत्यांनी लैंगिक संबंध कुणाशी ठेवावेत याबाबत पालकपशूंचे काहीच बंधन नसते. मानवी पालक मात्र आपल्या मुलांना आजन्म आपल्या बंधनात ठेवण्याचा प्रयत्न करतात. त्याच्या जीवनातील सर्व महत्त्वाच्या निर्णयांवर आपला अधिकार गाजविण्याचा प्रयत्न करतात; त्यांनी जन्मभर मानसिक दृष्ट्या परावलंबी रहावे असाच या पालकांचा प्रयत्न असतो.

'याचाच एक भाग म्हणून मुलांची लग्ने पालक लावतात व मुलांच्या संपूर्ण भावी वैवाहिक जीवनावर एकप्रकारे आपले वर्चस्व गाजवितात. प्राैढविवाहात मुलाच्या वा मुलीच्या मताला थोडे महत्त्व येण्याचा शक्यता असते, उलट बालविवाहात त्यांच्या मताला काडीचेही महत्त्व असू शकत नाही. तेव्हा प्रौढविवाहात आंतरजातीय विवाहाची किंचित तरी शक्यता असते; बालविवाहात ती सुतराम नसते. आणि खेड्यांत आजही बालविवाह मोठ्या प्रमाणावर होतात. तेव्हा बालविवाहाची प्रथा बंद होणे, प्रौढविवाहातही मुलांना स्वतःचा विवाह ठरविण्याचे जास्तीत जास्त स्वतंत्र्य मिळणे व आंतरजातीय विवाह करणाऱ्या मुलानाही पालकांनी व नातेवाइकांनी आपल्यात सामावून घेणे हे घडण्यासाठी पालकांचे मूल्य-परिवर्तन आवश्यक आहे. ते बिकट आहे, व त्यासाठी प्रौढशिक्षण, पालकांचे मेळावे व चर्चासत्रे यांचा उपयोग होऊ शकेल. त्याचबरोबर तरुणपिढीने या मूल्यपरिवर्तनासाठी शांततामय संघर्ष सतत चालू ठेवला पाहिजे.

या चळवळीचाच एक भाग म्हणून आणखी एका मुद्द्याचा विचार झाला पाहिजे. अशा चळवळीला बळकटी येण्यासाठी ज्यांचा आंतरजातीय विवाह झाला आहे त्यांना सामाजाची केवळ कोरडी सहानुभूतीच नव्हे तर पाठिंबा मिळाला पाहिजे. आज आंतरजातीय विवाह करणाऱ्यांना घरच्या, कुटुंबीयांच्या व एकूण समाजाच्या विरोधाला प्रखर तोंड द्यावे लागते. हा विरोध कमी करण्यासाठी समाजात आंतरजातीय विवाहाला अनुकूल असे वातावरण निर्माण केले पाहिजे.

## आंतरजातीय विवाह : मर्यादा –

शेवटी आंतरजातीय विवाह या शस्त्राच्या काही मर्यादांचा विचारही आवश्यक ठरतो. 'आंतरजातीय विवाह हा जातिनिर्मूलनाचा जातिव्यवस्था नष्ट करण्याचा एकमेव मार्ग आहे का ?' असा प्रश्न काही वेळा विचारला जातो. हे खरे आहे की आंतरजातीय विवाह हा एकमेव मार्ग नाही. पण बऱ्याचदा वरील प्रश्न म्हणजे एक पळवाट असते. याउलट असे म्हणता येईल की जातिव्यवस्था नष्ट केली पाहिजे असे ज्याला वाटते त्याने आंतरजातीय विवाहाला तत्त्वतः विरोध करणे असंगत आहे. 'आंतरजातीय विवाहामुळे खरेच जातिनिर्मूलन होईल का ? असाही प्रश्न विचारला जातो. आणि हेही खरे आहे की आंतरजातीय विवाहातून जातीचे उच्चाटन होईलच असे नाही. पण जातीचे बंधन पाळण्याबाबत सौम्यता तरी निश्चित निर्माण होईल. आंतरजातीय विवाहाकडे जात विसरण्याचे, नाहीशी करण्याचे एक साधन किंवा जातिविरोधी दृष्टिकोनाचा एक सहजाविष्कार म्हणून पाहिलेच गेले नाही तर आंतरजातीय विवाहातूनही जात तग धरून रहाण्याची हाव तीआहे. उदाहरणार्थ आंतरजातीय विवाहानंतर बऱ्याचदा पत्नीला पतीची जात लावली जाते. (आंतरजातीय विवाहात हे प्रश्न जास्त व जास्त बिकट असतात.) तसेच आंतरजातीय विवाहातून जन्मलेल्या मुलांना वडिलांची जात लावली जाते. या मलांचा पुन्हा आंतरजातीय पालक विरोध करणार नाहीत (स्वतःच्या उदाहरणावरून) इतकेच. पण पुन्हा हा मुलगा स्वतःची जात आपल्याही मुलांना लावण्याची शक्यता आहेच. तेव्हा आंतरजातीय विवाहातून खरोखर जातिनिर्मूलन होते की नाही याविषयी जागरुक रहाणे हाही या चळवळीचाच भाग असेल. आंतरजातीय विवाहितांनी स्वतःची जात कुठेही लावू नये, त्यांनी मुलालाही कुठलीच (आईची वा वडिलांची) जात लावू नये असा प्रचार केला पाहिजे. आंतरजातीय विवाह करण्यास उद्युक्त झाला असेल, त्यालाही वधूची जात आपल्यापेक्षा वेगळी आहे ना, हे पहावे लागेल व हा पर्यायाने जातीचाच विचार झाला) पण हा [जातीचा विचार म्हणजे अशी शिडी असेल की जिच्यावरूर चढून गेल्यावर ती फेकून देणेच योग्य. आंतरजातीय विवाह ज्या क्षणी ठरेल त्या क्षणी दोघांचा जातीचा विचार संपला पाहिजे.

तेव्हा जातिनिर्मूलनाचा एक मार्ग म्हणून आंतरजातीय विवाहाची चळवळ उभारणे शक्य आहे. 'विवाहाचा प्रश्न नाजुक आहे, खाजगी आहे व म्हणून आंतरजातीय विवाह ही केवळ वैयक्तिक बाब आहे. या युक्तिवादात काही तथ्य दिसत नाही. जास्तीत जास्त आंतरजातीय विवाह घडविणे, आंतरजातीय विवाहांना अनुकूल असे सामाजिक वातावरण निर्माण करणे व आंतरजातीय विवाहाची चळवळ ही जातिनिर्मूलनाची चळवळ व्हावी यासाठीसर्व प्रकारचे प्रयत्न करणे अशा तीन वाटांनी ही चळवळ चालविता येईल.

**– प्रदीप गोखले**